


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २७६ वा | गुरूवार दि १५ जानेवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# राज ठाकरेंच्या घोषणेनंतर फडणवीसांचा आक्रमक इशारा...

**वृत्तसंस्था/मुंबई**

महानगरपालिकेसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडत असताना मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने दुबार मतदान टाळण्यासाठी दोन्ही पक्षांकडून स्वतंत्र व्यवस्था केली आहे. भगवा गार्ड या नावाने सदर पक्षांकडून आपले कार्यकर्ते मतदान केंद्राबाहेर तैनात करण्यात आले असून दुबार मतदार दिसताच त्याला ठोका, अशा सूचना राज ठाकरेंकडून देण्यात आल्या आहेत. मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेनं हे पाऊल उचलल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार समाचार घेत आक्रमक इशारा दिला आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी भगवा गार्ड नावाने जी कोणती ब्रिगेड तयार केलीय ती सिलेक्टिव्ह आहे. ही ब्रिगेड मालवणी वगैरेसारख्या ठिकाणी दिसत नाही. मात्र मुंबईत कोणीही दहशत निर्माण करू शकत नाही. आता तेवढी त्यांची क्षमताही नाही. हे काय दहशत निर्माण करतील? यांच्यात तेवढी क्षमता राहिलेली नाही आणि कोणी दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केलाच तर पोलीस त्यांना ठोकून काढतील, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. ठाकरे बंधूंवर हल्लाबोल करताना मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, मुंबई किंवा कोणत्याच शहरातील दहशत खपवून घेतली जाणार नाही. दुबार मतदार असं ते म्हणतायत, पण तुमच्याकडे काय माहिती आहे त्याबद्दल? दुबार मतदार कोणी शोधले? निवडणूक आयोगाने हे दुबार मतदार शोधले आहेत. मतदान केंद्रावर तुमचा जो एजंट असतो त्याने दुबार मतदाराबद्दल आक्षेप घेतला पाहिजे. आम्हीही अशा दुबार मतदारांबद्दल आक्षेप घेऊ. पण आम्ही मारामाऱ्या करू, हा कोणता प्रकार आहे? मतदान कमी होण्यासाठीचा हा प्रयत्न आहे, असा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला आहे. नागपूरमधील प्रभाग क्रमांक ११ मधील भाजप उमेदवार भूषण शिंगणे यांना नुकतीच मारहाण करण्यात आली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज त्यांची भेट घेत काँग्रेसवर घणाघाती आरोप केले. काँग्रेसने नागपूरमध्ये अनेक नामचीन गुंडांना उमेदवारी दिली आहे. अशाच एका गुंडाने आमचे उमेदवार भूषण शिंगणे यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचा हात तुटला आहे, पायावर गाडी चढवण्याचा प्रयत्न केला, मोठ्या प्रमाणात त्यांना दुखापत झाली आहे. त्यांच्यासोबत इतरही कार्यकर्ते जखमी झाले आहेत. खूप मोठ्या प्रमाणात त्या गुंडाने दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. पण दहशतीला



आमचे कार्यकर्ते घाबरणार नाहीत आणि जनताही अशा दहशतीला मतपेटीतून उत्तर देईल. अशा ज्या गुंड प्रवृत्ती आहे त्यांचा अतिशय कडक बंदोबस्त केला जाईल. आधी कल्पना देऊनही पोलिसांनी योग्य कारवाई केली नाही, असं सगळ्यांचं मत आहे, त्याचीही चौकशी केली जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे

# ठाकरे बंधू की महायुती? मुंबईच्या महासंग्रामाचा काऊंटडाऊन सुरू; मतदानासाठी महापालिकेची यंत्रणा सज्ज

**वृत्तसंस्था/मुंबई**

देशाचे लक्ष लागून राहिलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या २२७ प्रभागांसाठी उद्या, १५ जानेवारी रोजी मतदान पार पडणार आहे. तब्बल नऊ वर्षांनंतर होत असलेल्या या निवडणुकीसाठी महापालिका आणि पोलीस प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले असून, गुरुवारी सकाळी ७ वाजेपासून मतदानाला सुरुवात होईल. शिवसेनेतील फ ुटीनंतरची ही पहिलीच निवडणूक असल्याने ही लढत केवळ श्रीमंत पालिकेच्या सत्तेसाठी नसून अस्तित्वाची आणि प्रतिष्ठेची ठरणार आहे. निवडणूक प्रक्रियेसाठी मुंबईत एकूण १० हजार २३१ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. या प्रक्रियेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रशासनाने ६४ हजार ३७५ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. आज २३ विभागीय केंद्रांवरून मतदान साहित्य वाटपाची प्रक्रिया पार पडली अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अश्विनी जोशी यांनी अंधेरी येथील क्रीडा संकुलात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. मतपेट्या, शाई, सील आणि मतदार यादीसह सर्व पथके आपल्या नियोजित केंद्रांकडे रवाना झाली आहेत. राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका होत असल्या तरी सर्वांचे लक्ष मुंबई कोणाची? याकडे लागले आहे. भाजप आणि शिवसेना (शिंदे) यांची महायुती विरुद्ध उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या पक्षांमधील ही लढत ऐतिहासिक ठरणार आहे. १७०० उमेदवार मैदानात असून, त्यात शिवसेना (ठाकरे), शिवसेना (शिंदे), भाजप, काँग्रेस, मनसे राष्ट्रवादी काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी या प्रमुख पक्षांसह तब्बल २९ पक्षांचे उमेदवार नशीब आजमावत आहेत.



यंदा राज्य निवडणूक आयोगाने मतदानानंतर लगेच दुसऱ्या दिवशी म्हणजेच १६ जानेवारी रोजी मतमोजणी जाहीर केली आहे. त्यामुळे निकालासाठी मुंबईकरांना फार वाट पाहावी लागणार नाही. मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी सर्व पात्र मतदारांना निर्भयपणे घराबाहेर पडून आपला मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले आहे. मतदानाच्या दिवशी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मुंबई पोलिसांनी शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे. संवेदनशील केंद्रांवर अतिरिक्त कुमक लावण्यात आली असून भरारी पथकेही सक्रीय आहेत.

# वैद्यकीय उपचारही... पर्यटनही!

महाराष्ट्र सरकारने नुकताच आरोग्य विभागातर्फे राज्याचा वैद्यकीय पर्यटन धोरणाचा मसुदा तयार केला. केंद्र शासनाने अशा प्रकारचा देशासाठीचा मसुदा २०२२ मध्ये तयार केलेला आहे. ङ्गआत्मनिर्भर भारतफ या ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी पर्यटन विकास मंत्रालयातर्फे या मसुद्यांतर्गत ध्येयाधोरण व रूपरेषा तयार करण्यात आलेली आहे. वैद्यकीय पर्यटन हा अलीकडच्या काळात बहरात आलेला मोठा व्यवसाय आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी व अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी या व्यवसायाकडे असंख्य देश लक्ष देत आहेत. त्यामुळे साहजिकच या व्यवसायामध्ये देशादेशांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे. जगातील बहुतांश देशांमध्ये कुशल व गुंतागुतीच्या शस्त्रक्रियेसाठी मनुष्यबळ उपलब्ध नाही, किंवा उच्च दर्जाची अत्याधुनिक उपकरणे नाहीत. अशा देशांतील रुग्ण उपचारांसाठी (अतिविशेष उपचार) प्रगत देशांकडे जातात. या बरोबरच पर्यटनाचीही सोय होत असेल तर असे रुग्ण अशा प्रकारच्या दुहेरी फायद्यासाठी उपयुक्त देश निवडतात. या परदेशातील मूळ वैद्यकीय उपचारासाठी व दुय्यम पर्यटनासाठी येणाऱ्या नागरिकांवर हा वैद्यकीय पर्यटनाचा व्यवसाय अवलबून आहे. जगभरातील रुग्ण वैद्यकीय उपचारांसाठी व त्यासोबत पर्यटनासाठी विविध विकसित देशांमध्ये जातात. या रुग्णांच्या देशनिवडीवर जागतिक पातळीवर ङ्गवैद्यकीय पर्यटन निर्देशांकफ काढला जातो. या देशांच्या यादीमध्ये अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, जपान हे देश पहिल्या पाच क्रमांकामध्ये येतात. यात भारत जगात दहाव्या क्रमांकावर आहे. वैद्यकीय पर्यटन व स्वास्थ्य पर्यटन (वेलनेस) यात थोडे अंतर आहे. स्वास्थ्य पर्यटन हे निरोगी अवस्थेत चैतन्य प्राप्तीसाठी, आठवड्याचा थकवा घालवण्यासाठी, मनोरंजनासाठी, पाहुणचारासाठी, विश्रांतीसाठी केले जाते. यातही भारत जागतिक पातळीवर स्वास्थ्यपर्यटन निर्देशांकामध्ये सातव्या क्रमांकावर आहे. वैद्यकीय पर्यटनामधून आर्थिक विकास केलेल्या देशामध्ये थायलंड, मेक्सिको, सिंगापूर, तुर्की, तैवान, ब्राझील यांचा क्रम खूप वरचा आहे. सध्या जगामध्ये वैद्यकीय पर्यटनासाठी एक कोटी, ४० लाख लोक (रुग्ण व नातेवाईक) प्रवास करतात. यामुळे दरवर्षी साधारणपणे ६० ते ८० अब्ज डॉलर इतकी आर्थिक उलाढाल होते. भारतामध्ये साधारणपणे १० लाख लोक प्रतीवर्षी वैद्यकीय पर्यटनासाठी येतात. हे प्रमाण मागील १० वर्षात दुप्पट झालेले आहे. हेच प्रमाण २०१६ मध्ये ४ लाख ३० हजार प्रवासी असे होते. यामध्ये होणारी भारतातील आर्थिक उलाढाल साधारणपणे ७ ते ८ अब्ज डॉलर एवढी आहे. वैद्यकीय पर्यटनासाठी काही महत्त्वाच्या सुविधा देशामध्ये असाव्या लागतात. या यादीमध्ये प्रथम क्रमांक हा पायाभूत सुविधांचा लागतो. भारतामध्ये कॉर्पोरेट रुग्णालयांमध्ये अतिउच्च दर्जाची उपकरणे व यंत्रसामग्री उपलब्ध आहे. यामध्ये सी.टी, एम.आर.आय, पेट स्कॅन, लिनीयर अॅक्सलरेटर, कलर डॉप्लर, डिजिटल, रेडिओग्राफी, इंट्राऑपरेटीव्ह स्कॅनर इत्यादी उपकरणांचा समावेश होतो. यांच्या साह्याने गुंतागुंतीचे हृदय प्रत्यारोपण , यकृत प्रत्यारोपण, दंतरोगावरील इम्प्लांट, जॉइन्ट रिप्लेसमेन्ट, कॅन्सरवरील उपचार, अस्थिव्यंगोपचार आदी उपचार करता येतात. वैद्यकीय पर्यटनासाठी दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे कुशल मनुष्यबळ. भारतातील वैद्यकीय क्षेत्रामध्ये मनुष्यबळ हे तीन विभागांत उपलब्ध आहे. एक डॉक्टर, दुसरा परिचारिका व तिसरा घटक आहे पॅरामेडीकल/तंत्रज्ञ. या तीनही मनुष्यबळामध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेले कुशल मनुष्यबळ बहुतांशी कॉर्पोरेट रुग्णालयामध्ये उपलब्ध आहे. पायाभुत सुविधा व कुशल मनुष्यबळ यानंतर तिसरा क्रमांक लागतो तो उपचाराच्या शुल्काचा किंवा रुग्णांना येणाऱ्या खर्चाचा. भारतातील उपचार हे अमेरिका, इंग्लंड इत्यादी प्रगत देशांच्या तुलनेने खूपच स्वस्त आहेत (७० टक्के कमी दराने) त्यामुळे बहुतांशी देशांतील रुग्णांना ते परवडतात. तसेच त्यांचा दर्जाही चांगला असतो. भारतामध्ये रुग्णांची प्रतीक्षायादी कमी आहे; त्यामुळे परदेशी रुग्णांना लवकर संधी मिळते व उपचारासाठी थांबावे लागत नाही. इतर प्रगत देशामध्ये रुग्णांची प्रतीक्षा यादी मोठी असल्याने रुग्णांन संधीसाठी दीर्घकाळ लागतो. भारतामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मानांकने प्राप्त असलेल्या दर्जेदार रुग्णालयांची संख्या खूप मोठी आहे. दुर्दैवाने यात महाराष्ट्रातील एकही सार्वजनिक रुग्णालय मोडत नाही. परदेशी रुग्ण अशा प्रकारचे आंतरराष्ट्रीय मानांकन पाहूनच रुग्णालयात भरती होतो. यामुळे त्याला शहरांचा, रुग्णालयांचा तसेच कुशल डॉक्टर निवडण्याचा पर्याय उपलब्ध असतो. शस्त्रक्रियेनंतर किंवा दोन उपचारांच्या फेऱ्यांनंतर उपलब्ध वेळेमध्ये रुग्णांना जवळच्या महत्त्वाच्या प्रेक्षणीय स्थळांना भेटीची व्यवस्था रुग्णालयामार्फत केली जाते. हा खर्चही रुग्णालयाच्या बिलामध्ये समाविष्ट करून विमा कंपनीकडून रुग्णांना तो मिळेल, याची व्यवस्था केली जाते. यासाठी रुग्णालय, ट्रॅव्हल एजन्सी, विमान कंपनी, विमा एजंट इत्यादी अधिकाऱ्यांचे संघटित नेटवर्क अवश्यक असते.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# प्रचार संपला अन बावनकुळे वादाच्या भोवऱ्यात; नागपुरात भाजप-काँग्रेस कार्यकर्त्यांत तणाव



**नागपूर :** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागपूर शहरातील प्रभाग क्रमांक १० मध्ये बुधवारी राजकीय वातावरण तापले. प्रचाराची मुदत संपल्यानंतर पालकमंत्री व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे भाजपच्या उमेदवारासोबत फिरत असल्याचा आरोप काँग्रेसच्या उमेदवारांनी केला. या आरोपांमुळे परिसरात तणावाची स्थिती निर्माण झाली असून गिट्टी खदान पोलीस ठाण्याच्या हद्दीत काँग्रेस व भाजप कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक वाद झाला. पोलिसांच्या तत्पर हस्तक्षेपामुळे पुढील अनर्थ टळला.काँग्रेस उमेदवारांनी आरोप केला की, चंद्रशेखर बावनकुळे हे नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री असले तरी प्रचाराची वेळ संपल्यानंतर त्यांनी प्रभाग १० मध्ये भाजप उमेदवारासोबत फिरणे हे निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन आहे. पालकमंत्री म्हणून ते कुठेही जाऊ शकतात, मात्र प्रचारबंदी लागू झाल्यानंतर एखाद्या उमेदवारासोबत फिरणे चुकीचे आहे, असा दावा काँग्रेसकडून करण्यात आला. या प्रकरणामुळे कुतुबशहा नगर परिसरात वातावरण तणावपूर्ण झाले. काँग्रेस शहराध्यक्ष विकास ठाकरे हेही घटनास्थळी दाखल झाले होते.काँग्रेस उमेदवारांनी आरोप केला की, चंद्रशेखर बावनकुळे हे नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री असले तरी प्रचाराची वेळ संपल्यानंतर त्यांनी प्रभाग १० मध्ये भाजप उमेदवारासोबत फिरणे हे निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन आहे. पालकमंत्री म्हणून ते कुठेही जाऊ शकतात, मात्र प्रचारबंदी लागू झाल्यानंतर एखाद्या उमेदवारासोबत फिरणे चुकीचे आहे, असा दावा काँग्रेसकडून करण्यात आला. या प्रकरणामुळे कुतुबशहा नगर परिसरात वातावरण तणावपूर्ण झाले. काँग्रेस शहराध्यक्ष विकास ठाकरे हेही घटनास्थळी दाखल झाले होते.यावेळी काँग्रेस व भाजप कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक झडप झाली. परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेऊन गिट्टी खदान पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत दोन्ही बाजूंना शांत केलेदरम्यान, या आरोपांवर महसूल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्टीकरण दिले. ङ्गकुतुबशहा नगरमधील राजू देवगडे हे माझे अत्यंत जवळचे कार्यकर्ते आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी मला त्यांच्या घरी बोलावले होते. त्या निमित्ताने मी काही कार्यकर्त्यांच्या घरी भेटीगाठी घेत होतो,ङ्घ असे बावनकुळे यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांमध्ये गैरसमज झाला की मी निवडणूक प्रचारासाठी आलो आहे. मात्र हा पूर्णपणे गैरसमज होता. काँग्रेसचे शहराध्यक्ष विकास ठाकरे घटनास्थळी आले होते. त्यांना सर्व वस्तुस्थिती समजावून सांगितली असून सत्य त्यांच्या लक्षात आले आहे. त्यामुळे काँग्रेसचा गैरसमज आता दूर झाला असेल, असे मला वाटते. निवडणूक आयोगाच्या नियमांबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, ङ्गनिवडणूक आयोगाच्या नियमानुसार प्रचार न करता, कोणतेही पत्रक न वाटता कार्यकर्त्यांच्या घरी भेट देण्यास परवानगी आहे.

## बदलापूर भाजपची पाठ सोडेना; शिंदेंच्या होमपीचवर पुन्हा गोची



**ठाणे :** बदलापूरमधील राजकीय घडामोडींनी भाजपच्या नाकीनऊ आणले आहेत. बदलापूर नगर परिषदेत भाजपनं शिंदेसेनेला धक्का देत नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजय मिळवला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना भाजपनं त्यांच्याच ठाणे जिल्ह्यात जोरदार धक्का दिला. पण त्यानंतर बदलापुरात घडत असलेल्या घडामोडी भाजपसाठी सातत्यानं अडचणीच्या ठरत आहेत. स्वीकृत नगरसेवकांचा वाद पेटल्यानं भाजपची चांगलीच गोची झाली आहे.,दोन वर्षांपूर्वी बदलापूरमधील शाळेत चिमुकल्या विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार झाला. ते प्रकरण प्रचंड पेटलं. ज्या शाळेत चिमुकल्या मुलींवर लैंगिक शोषण त्या शैक्षणिक संस्थेचे सचिव तुषार आपटे यांना भाजपनं कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेत स्वीकृत नगरसेवकपदी संधी दिली. लैंगिक शोषण प्रकरण उजेडात आल्यानंतर तुषार आपटे अनेक दिवस फरार होते. तब्बल ४४ दिवसांनंतर त्यांना कर्जतमधून अटक करण्यात आली होती. त्यानंतर अवघ्या ४८ तासांत त्यांना जामीन मंजूर झाला होता. नगर परिषद निवडणुकीत ते भाजपसाठी सक्रिय होते. तुषार आपटे यांना स्वीकृत नगरसेवकपद देण्याचा निर्णय भाजपच्या चांगलाच अंगाशी आला. त्यानंतर प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या सुचनेवरुन आपटे यांनी नगरसेवकपदाचा राजीनामा दिला. यानंतर भाजपनं शगोफ गोरे यांची स्वीकृत नगरसेवकपदी वर्णी लावली. मात्र या निवडीलाही विरोध होताना दिसत आहे. पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता स्वीकृत नगरसेवकांची यादी तयार करण्याचा आरोप झाला आहे. या प्रकरणी भाजपचे पदाधिकारी राम पातकर यांनी आपल्याच पक्षावर गंभीर आरोप केले आहेत. प्रदेशाध्यक्षांनी जिल्हाध्यक्षांना एक पत्र दिलेलं आहे. त्यानुसार एक समिती नेमायला हवी. ती समिती नेमून कुळगाव-बदलापूर नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली पाहिजे.

## 'धुरंदर' नेत्याला मदतीसाठी साद, निकाल फिरणार?

**अकोला :** अकोला महापालिकेत लक्षवेधी घडामोडी घडत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं प्रकाश आंबेडकर यांच्याकडे मदत मागितली आहे. अकोल्यात वंचितचे उमेदवार नसलेल्या जागांवर शिंदेसेनेनं वंचितकडे मदतीचा हात मागितला आहे. वंचितची मतं शिंदेसेनेच्या बाजूनं वळवण्याची विनंती करण्यात आली आहे. शिंदेंच्या शिवसेनेकडून मंत्री संजय राठोड वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांच्याशी चर्चा करत आहेत. शहराबाहेर असलेल्या एका अज्ञात ठिकाणी आंबेडकर आणि राठोड यांच्यात बैठक झाल्याची चर्चा आहे.अकोला महापालिकेत शिंदेसेना ८० पैकी ७२ जागांवर लढत आहे. तर वंचित ५४ जागा लढवत आहे. मतदान अवघ्या काही तासांवर आलेलं असताना शिंदेसेनेनं मोठा डाव टाकला आहे. शिंदेसेनेनं थेट वंचितकडे मदतीची मागणी केली आहे. वंचित लढवत नसलेल्या जागांवर आम्हाला मदत करा, अशी मागणी शिंदेसेनेकडून करण्यात आली आहे. शिंदेसेनेचे नेते संजय राठोडांनी प्रकाश आंबेडकरांसोबत चर्चा सुरु असल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

## किती नगरसेवक फुटतील? निवडणुकीच्या रणधुमाळीत खडसेंचा मोठा गौप्यस्फोट



**जळगाव :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल मोठा गौप्यस्फोट केला आहे. नगरसेवक फुटतील का, किती नगरसेवक फुटू शकतात, अशी विचारणा करणारा कॉल एकनाथ शिंदे यांनी मला केला होता, असं खडसे यांनी एका सभेत सांगितलं. सोमवारी झालेल्या सभेत ते बोलत होते.शिंदे साहेबांचा मला फोन आला होता. जळगावात काय करायचं, अशी विचारणा त्यांनी केली. नगरसेवक फुटू शकतात का, असं एकनाथ शिंदे यांनी मला विचारलं. मी होकारार्थी उत्तर दिलं. त्यावर शिंदे यांनी किती नगरसेवक फुटू शकतात, असा प्रश्न केला. त्यावर २७, २८ ते ३० नगरसेवक फुटू शकतात, असं मी शिंदे यांनी सांगितलं. तुम्ही जितकी पाकिटं द्याल, तितके नगरसेवक फुटू शकतात, असं मी शिंदे यांना कॉलवर सांगितलंइकडे बाजार भरलाय. साताऱ्यात एका ठिकाणी गाढवांचा बाजार भरतो. तसा जळगावात नगरसेवकांचा बाजार भरलाय, असं मी शिंदेंना सांगितलं. त्यांना पुढे इतकंच म्हटलं, कोणाला काही सांगू नका. गुलाबराव पाटील यांना तर अजिबात काही सांगू नका. त्यांचे आणि सुरेश दादा जैन यांचे संबंध चांगले आहेत. त्यामुळे गुलाबरावांना काहीच सांगू नका, असं मी शिंदे यांना म्हणालो आणि हा किस्सा त्यांच्या माझ्यातच राहिला,' असं खडसे यांनी सभेत सांगितलं. हा किस्सा गेल्या पंचवार्षिकचा असल्याचं खडसे म्हणाले.२०१८ मध्ये जळगावमध्ये महापालिका निवडणूक झाली. त्या निवडणुकीत भाजप नं बाजी मारली. राज्यात सत्तेवर असलेल्या भाजपनं ७५ पैकी ५७ जागा जिंकल्या. त्यावेळी राज्यात मराठा आरक्षण, शेतकरी कर्जमाफी, बेरोजगारी असे मुद्दे तापलेले होते. पण जळगावात धक्कादायक निकाल लागला. भाजप पाठोपाठ शिवसेनेला १५ जागा मिळाल्या. तर एमआयएमनं ३ जागा जिंकल्या. जळगाव महापालिकेत तब्बल ४० वर्ष सुरेश जैन यांचं वर्चस्व होतं.

## काळी बाहुली, लिंबू अनब टाचण्या; ठाकरेंच्या शिलेदारावर भानामतीचा प्रकार





**कोल्हापूर :** राज्यात महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाची तयारी पूर्ण होऊन सर्वांचे लक्ष मतदानाकडे लागले आहे. त्यातच कोल्हापूर जिल्ह्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा प्रमुख रविकिरण इंगवले यांच्यावर राधानगरी तालुक्यातील दुर्गमानवाड येथे भानामती केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाच्या ठीक आदल्या दिवशी हा प्रकार समोर आल्याने राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात तीव्र खळबळ उडाली आहेगेल्या तीन-चार वर्षांपासून रविकिरण इंगवले शहरातील विविध स्थानिक समस्या, सामाजिक प्रश्न आणि विकासाच्या मुद्द्यांवरून आंदोलने करत आहेत. महापालिका निवडणुकांच्या प्रचारावेळी महायुतीच्या नेत्यांवर गुन्हेगारी पार्श्वभूमी, भ्रष्टाचार आणि नातेवाईकांना उमेदवारी देण्याचे गंभीर आरोप त्यांनी केले. बलभीम बँक घोटाळा, आमदार पुत्राची उमेदवारी यासह विविध मुद्द्यांवरुन त्यांनी प्रचारसभांमधून जोरदार हल्ला चढवला होता.या काळात इंगवले यांनी कोल्हापूर महानगरपालिकेच्या प्रभागांतील रस्ते, पाणीपुरवठा आणि ड्रेनेजसारख्या समस्या उपस्थित करून नागरिकांमध्ये पक्षाची पकड मजबूत केली. पक्षाच्या वचननामा प्रकाशन सोहळ्यातही त्यांनी उपस्थिती लावून विकासाभिमुख भूमिका मांडली. महायुतीच्या उमेदवारांविरुद्ध त्यांचे आरोप निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अधिक तीव्र झाले होते.सोमवारी मध्यरात्री राधानगरी तालुक्यातील दुर्गमानवाड देवस्थान मंदिराजवळील झाडावर इंगवले यांचा फोटो खिळे ठोकून भानामती करण्यात आली होती. काळी बाहुली, लिंबू, टाचण्या यांसारखे साहित्य वापरल्याची माहिती समोर आली असून, हा प्रकार आज सकाळी ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांना आढळला. त्यांनी तात्काळ इंगवले यांना कळवले. मतदानाच्या एका दिवस आधी असा प्रकार घडल्याने दुर्गमानवाड आणि परिसरात भीतीचे वातावरण पसरले. स्थानिक कार्यकर्ते व नागरिकांनी घटनास्थळी जमा होऊन निषेध व्यक्त केला.कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट आघाडीने वचननामा जारी करून विकासाच्या मुद्द्यांवर भर दिला आहे. इंगवले यांच्या आक्रमकतेमुळे महायुतीमध्ये अस्वस्थता असल्याचे राजकीय निरीक्षक सांगतात. त्यातच हा प्रकार निवडणुकीच्या वातावरणात तणाव वाढवणारा ठरला आहे. दरम्यान परिसरातील ग्रामस्थांनी अंधश्रद्धेच्या विरोधात आवाज उठवला असून, पोलिसांकडे गुन्हा दाखल करण्याची मागणी होत आहे. राजकीय वर्तुळात याचे परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# पैशांच्या वादातून मित्राला कारमध्येच संपवलं..

**पुणे :** रायगड जिल्ह्यातील ताम्हिणी घाट परिसरात पैशाच्या वादातून मित्रांनीच तरुणाची निर्घृण हत्या केल्याचा धक्कादायक प्रकरण उघडकीस आला असून, या हत्या प्रकरणातील मुख्य व फरारी आरोपीला अखेर पोलिसांनी रेल्वेतच शिताफीने अटक केली आहे. या घटनेमुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली असून, मैत्रीच्या नात्याला काळीमा फासणारा हा प्रकार समाजाला हादरवणारा ठरला आहे.माणगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) व ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी सोन्या उर्फ प्रज्वल संतोष हंबीर (रा. खांदवेनगर, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे) हा घटनेनंतर फरार झाला होता. पैशांच्या व्यवहारातून झालेल्या वादाचं रूपांतर हाणामारीत होऊन अखेर थेट हत्येत झालं, असं तपासात समोर आलं आहे. तर या प्रकरणात पुणे कनेक्शन देखील असल्याचं सांगण्यात येत आहे.रायगड पोलिसांकडून आरोपीचा कसून शोध सुरू असतानाच, दि. १३ जानेवारी २०२६ रोजी आरोपी सोलापूरहून पुण्याच्या दिशेने इंद्रायणी



एक्सप्रेसनं प्रवास करत असल्याची गोपनीय माहिती पुणे लोहमार्ग पोलीस दलाच्या पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांना मिळाली. माहिती मिळताच त्यांनी तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब अंतरकर आणि दौंड लोहमार्ग पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक राजेंद्र गायकवाड यांना सूचित केलं.यानंतर दौंड लोहमार्ग पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकांची स्थापना करण्यात आली. एक पथक पुणे रेल्वे स्टेशनकडे तर दुसरे दौंड रेल्वे स्टेशनकडे रवाना झाले. रेल्वेमध्ये तपास सुरू असताना आरोपी इंद्रायणी एक्सप्रेसच्या बोगी क्रमांक डी-७, सीट क्रमांक २३ वर आढळून आला. तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक दयानंद शरणार्थी, पोहवा आनंद वाघमारे, पोलीस शिपाई मनोज म्हेत्रे, गोकुळ हिवाळे आणि संदीप उसरे यांनी अत्यंत शिताफीने आणि कोणत्याही प्रवाशास त्रास न होता आरोपीस ताब्यात घेतलं. आरोपीला पुणे रेल्वे स्टेशन येथे आणून पुढील कारवाईसाठी रायगड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आलं आहे. ही संपूर्ण कारवाई पुणे लोहमार्ग पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, अपर पोलीस अधीक्षक रोहीदास पवार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी मनोजकुमार यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.पैशांच्या वादातून मैत्रीचा शेवट रक्तरंजित हत्येत झाल्यानं ताम्हिणी घाट परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. फरारी आरोपीच्या अटकेमुळे या हत्या प्रकरणाचा तपास वेग घेणार असून, इतर आरोपींची भूमिका व संपूर्ण कट उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## दोन वाहनं समोरासमोर धडकली, भीषण अपघातात एकाचा मृत्यू

**इंदापूर :** उसाचा ट्रॅक्टर आणि स्विफ्ट गाडी यांच्यामध्ये झालेल्या अपघातात एक जणाचा मृत्यू झाला आहे. तर, दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. सदरचा अपघात भिगवण राशीन राज्य महामार्गावर डिकसळ (तालुका इंदापूर) गावच्या हद्दीत मंगळवारी (१३ जानेवारी) रात्री साडेदहाच्या सुमारास घडला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे.अतुल बाबूलाल गजरमल (वय ३८ रा. कात्रज ता. करमाळा, जि. सोलापूर) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीचे नाव आहे. विजय हनुमंत शिंदे (वय ३८) आणि दादासो सर्जेराव डुबे (वय ३५, दोघेही रा. कात्रज ता. करमाळा जि. सोलापूर) हे दोघे गंभीररित्या जखमी झाले आहेत.या अपघाताची माहिती मिळताच भिगवण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी अपघातग्रस्त वाहनं बाजूला करत वाहतूक सुरळीत करण्यात आली. विशेष म्हणजे या ऊस हंगामात बारामती राशीन या राज्य मार्गावरील हा सातवा बळी ठरला असून, ट्रॅक्टर चालकांच्या बेफिकिरीमुळे अपघातांचे प्रमाण वाढत





असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.याप्रकरणी भिगवण पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, चारचाकी स्विफ्ट कार (एम. एच. १२ के. वाय. १६१५) ही भिगवण बाजूकडून राशीन बाजूकडे निघाली होती. तर ऊस वाहतूक करणारा ट्रॅक्टर (एम. एच. ४५ एफ ३०२५) हा बारामतीच्या दिशेने निघाला होता. यावेळी त्या दोन वाहनांमध्ये समोरासमोर जोरदार धडक झाली.या अपघातात सुदैवाने ट्रॅक्टर चालकाला मोठी दुखापत झाली नसली तरी या अपघातात एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पुढील तपास भिगवण पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करीत आहेत.

## रात्री हलवा खाऊन झोपी गेले, सकाळी ५ वर्षांच्या मुलासह संपूर्ण कुटुंबाचा अंत, तोंडातून फेस

**चंदीगड :** एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाल्याची भयंकर घटना घडली आहे. मृतांमध्ये पती, पत्नी आणि त्यांच्या ५ वर्षांच्या मुलाचा समावेश आहे. ही घटना हरियाणातील फरिदाबादच्या सरूरपूर भागात घडल्याची माहिती आहे. कुटुंबातील पती, पत्नी, मुलगा आणि मृताचा भाऊ हे सर्व रात्री झोपी गेले. मात्र, सकाळी त्यापैकी तिघे मृत आढळून आले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी तिघांचेही मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठवले. जिथे या तिघांचा मृत्यू झाला त्या खोलीत शेकोटी आढळून आली होती. मात्र, शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचं कारण स्पष्ट होईल, असं पोलिसांनी सांगितलं.मृतांमध्ये रमेश, त्याची पत्नी ममता आणि त्यांचा ५ वर्षांचा मुलगा छोटू यांचा समावेश आहे. रमेशचा भाऊही त्यांच्यासोबत राहत होता. ममता, रमेश आणि त्याचा भाऊ हे सर्व कामगार आहेत. घरमालकाच्या म्हणण्यानुसार, त्यांनी दोन महिन्यांपूर्वीच त्याच्याकडून घर भाड्याने घेतले होते. ते मूळचे बिहारचे होते. घरमालकाने दिलेल्या



माहितीनुसार, मृताचा भाऊ परशुरामने त्याला फोन करून कळवले की त्याचा भाऊ, वहिनी आणि पुतण्या उठत नाहीयेत, लवकर घरी या. जेव्हा ते घरी पोहोचले तेव्हा त्यांना हे तिघे मृतावस्थेत पडलेले आढळून आले.याप्रकरणी मिळालेल्या माहिचीनुसार, आदल्या रात्री ममताने हलवा बनवला होता आणि सर्वांनी तो खाल्ला होता. त्यानंतर ते सर्व झोपी गेले. मात्र, पहाटे पाच वाजतो जेव्हा तो उठला तेव्हा त्याला भाऊ आणि वहिनी झोपलेले दिसले. त्यामुळे त्याने उठवण्याचा प्रयत्न केला, पण ते उठले नाहीत. त्यानंतर त्याने पुन्हा तोच हलवा खाल्ला आणि झोपी गेला. परशुरामच्या म्हणण्यानुसार, रमेशच्या नाकातून आणि तोंडातून रक्त येत होते आणि इतरांच्या तोंडातून फेस येत होता. त्याने ताबडतोब पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह ताब्यात घेतले आणि पोस्टमॉर्टमसाठी बादशाह खान सिव्हिल हॉस्पिटलला पाठवले.घटनास्थळावरून एक शेकोटी सापडली आहे. मात्र, या प्रकरणाची सखोल चौकशी केली जात आहे.

# पत्नीची लेकीच्या ताब्यासाठी मागणी, तो संतापला अनब घरातच आठ वर्षांच्या लेकीला संपवलं

**नागपूर :** नागपूरच्या वाठोडा परिसरातून एक हृदयद्रावक आणि समाजाला हादरवून टाकणारी घटना समोर आली आहे. पत्नीशी सुरू असलेल्या कौटुंबिक वादातून एका पित्याने आपल्या आठ वर्षांच्या चिमुकल्या मुलीची चाकूने निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (१४ जानेवारी) पहाटे घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संताप आणि हळहळ व्यक्त होत असून, वाठोडा पोलिसांनी आरोपी पित्याला अटक केली आहे.ही घटना वाठोडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सरोदेनगर परिसरातील प्लॉट क्रमांक १२ येथे बुधवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास घडली. शेखर शेंदरे (वय ४६) असे आरोपी पित्याचे नाव असून, धनश्री शेंदरे (वय ८) असे मृत चिमुकलीचे नाव आहे. धनश्री ही आजी कुसुमबाई आणि वडिलांसोबत राहत होती.मिळालेल्या माहितीनुसार, शेखर शेंदरे आणि त्याची पत्नी शुभांगी यांच्यात गेल्या अनेक वर्षांपासून वाद सुरू होता. पत्नी शुभांगी वेगळी राहत होती आणि मुलीचा ताबा (कस्टडी) आपल्याकडे देण्याची मागणी करत होती. मात्र, शेखर याला तीव्र विरोध करत होता. याच कारणावरून दोघांमध्ये सतत वाद होत असल्याचे सांगितले जाते. आरोपी दारूच्या आहारी गेला होता आणि पत्नीवर संशय घेत मारहाण करत असल्याचेही पोलिस तपासात पुढे आले आहे.बुधवारी पहाटे आरोपी दारूच्या नशेत होता. याच दरम्यान धनश्रीने पाणी मागितले आणि आधीपासून मनात असलेल्या रागाच्या भरात शेखरने थेट चाकू उचलून मुलीच्या



छातीत वार केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. रक्ताच्या थारोळ्यात पडलेली धनश्री मदतीसाठी रडत होती. तिच्या किंकाळ्या ऐकून आजी कुसुमबाई आणि काका उमेश घटनास्थळी धावले.गंभीर जखमी अवस्थेत धनश्रीला तातडीने वाठोडा पोलिस ठाण्यात नेण्यात आले. पोलिसांनी कोणताही विलंब न करता तिला मेडिकल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी धनश्रीला मृत घोषित केले. या घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली असून, नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.

आजी कुसुमबाई शेंदरे यांच्या तक्रारीवरून वाठोडा पोलिस ठाण्यात शेखर शेंदरे याच्याविरोधात हत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, घटनेचा सखोल तपास सुरू आहे. कौटुंबिक वादातून एका निष्पाप चिमुकलीचा बळी गेल्याने ही घटना समाजाला अंतर्मुख करणारी ठरत आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# न्यूझीलंडचा टीम इंडियावर मोठा विजय

## ७ गडी राखून भारतावर विजय मिळवला; मिशेलची खेळी टीम इंडियाला पडली महागात

**राजकोट :** गुजरातच्या राजकोटमध्ये खेळलेल्या गेलेल्या दुसऱ्या वनडे सामन्यात न्यूझीलंडने टीम इंडियावर ७ विकेटने विजय मिळवला आहे. टीम इंडियाने न्यूझीलंडला २८५ धावांचं आव्हान दिल होते. टीम इंडियाचं आव्हान न्यूझीलंडने ७ गडी राखून पार केलं. डेरिल मिशेलची खेळी टीम इंडियाला महागात पडली.




न्यूझीलंडसाठी डेरिल मिशेलने ११२ चेंडूत १३१ धावा कुटल्या. विल यंगने ८७ धावा कुटल्या. ग्लेन फिलिप्स ३२ धावा करून नाबाद राहिला. न्यूझीलंडने हा सामना जिंकून तीन सामन्यांच्या वनडे सीरीजमध्ये १-१ ने बरोबरी साधली आहे.


२८५ धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात चांगली झाली नाही. डेवोन कॉनवेला अवघ्या १६ धावांवर बाद करून न्यूझीलंडवर दबाव निर्माण केला. मात्र, डेरिल मिशेल आणि विल यंगच्या जोडीने टीम इंडियाला घाम फोडला. दोघांनी तिर्सया विकेटसाठी १५२ चेंडूत १६२ धावांची भागीदारी केली. यंगने ९८ चेंडूत ८७ धावा कुटल्या. तर या डावात डेरिल मिशेलने शतकी खेळी खेळली. त्याने वनडे करिअरमधील ८वे शतक ठोकलं.

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना गिलने अर्धशतकी खेळी केली. तर शेवटी केएल राहुलने दमदार शतक झळकावलं. पण गोलंदाज दिलेल्या आव्हानाचा यशस्वी बचाव करू शकलेले नाही. त्यामुळे भारतीय संघाला हा सामना ७ गडी राखून गमवावा लागला आहे. हो मालिका सध्या १- १ ने बरोबरीत आहे. त्यामुळे मालिकेतील शेवटचा सामना निर्णायक ठरणार आहे.

या सामन्यानंतर बोलताना न्यूझीलंडचा कर्णधार मायकल ब्रेसवेल म्हणाला, संपूर्ण संघाने दमदार कामगिरी केली. मला माझ्या संघाचा अभिमान आहे. मध्यंतराच्या वेळी आम्ही खूप आनंदी होतो. आम्ही खूप चांगली गोलंदाजी केली. आम्ही कुठल्याही धावसंख्येचा पाठलाग करण्यासाठी पूर्णपणे तयार होतो.

तसेच तो पुढे म्हणाला, ङ्गआमच्या गोलंदाजांनी अतिशय चांगली गोलंदाजी केली. सर्व खेळाडूंनी दबावाच्या परिस्थितीशी जुळवून घेतले आणि दबावाच्या क्षणी स्वत:ला सावरले, ते खरोखरच कौतुकास्पद होते. त्यानंतर फलंदाजीत मिशेल आणि यंग यांनी भारताच्या हातून सामना हिसकावून घेतला. भारतीय संघाने न्यूझीलंड समोर विजयासाठी २८५ धावांचे आव्हान ठेवले होते. या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले होते. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाकडून रोहित शर्माने २४ धावा केल्या. तर शुबमन गिलने ५६ धावांची खेळी केली. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या विराट कोहलीने २३ धावा केल्या. श्रेयस अय्यर ८ धावा करत माघारी परतला. केएल राहुलने शेवटी नाबाद ११२ धावांची खेळी केली. रवींद्र जडेजाने २७ आणि नितीश कुमार रेड्डीने २० धावांची खेळी केली.

# दिल्लीने अखेरच्या चेंडूवर जिंकला सामना; युपी वॉरियर्जची पराभवाची हॅटट्रिक







**दिल्ली :** दिल्ली कॅपिटल्स संघाने अखेरच्या चेंडूवर युपी वॉरियर्ज संघावर ७ विकेट्सने रोमांचक विजय मिळवला. कर्णधार जेमिमा रॉड्रीग्जच्या नेतृत्त्वाखाली दिल्ली कॅपिटल्सने स्पर्धेतील पहिला विजय नोंदवला. दिल्ली संघाने उत्कृष्ट कामगिरी केली असली तरी युपी वॉरियर्जने मात्र शेवटच्या चेंडूपर्यंत कडवी झुंज दिली. पण अखेरीस दिल्लीने विजय मिळवला.

गुजरात जायंट्सविरूद्ध आधीच्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचा संघ अखेरच्या षटकात ६ धावा करण्यात अपयशी ठरला होता. यावेळेस युपी वॉरियर्जविरूद्ध देखील सारखंच चित्र होतं. दिल्लीला अखेरच्या षटकात विजयासाठी ६ चेंडूत ६ धावांची गरज होती. फिरकीपटू सोफी एकलस्टन गोलंदाजी करत होती, पहिला चेंडी डॉट बॉल राहिला, त्यानंतर मारिजन कापने दुसऱ्या चेंडूवर चौकार खेचला. तिसरा, चौथा दोन्ही चेंडू डॉट बॉल राहिले. पाचव्या चेंडूवर मारिजन कापने एक धाव घेतली आणि अखेरच्या चेंडूवर एका धावेची गरज असताना लॉरा वोल्व्हार्डने चौकार लगावत संघाला अखेरीस पहिला विजय मिळवून दिला.

युपी वॉरियर्जने दिलेल्या १५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरूवात दणक्यात झाली. दिल्लीकडून शफाली वर्मा व लिझेल ली यांनी पहिल्या विकेटसाठी ९४ धावांची भागीदारी रचली. शफाली वर्मा ३२ चेंडूत ६ चौकारांसह ३६ धावा करत बाद झाली. तर लिझेल ली ४४ चेंडूत ८ चौकार व ३ षटकारांसह ६७ धावा करत बाद झाली. त्यानंतर लॉरा वोल्व्हार्ड व जेमिमा रॉड्रीग्ज यांनी संघाचा डाव पुढे नेला. पण जेमिमने पुन्हा एकदा गुजरात जायंट्सविरूद्ध सामन्यातील विकेटप्रमाणे आपली विकेट गमावली. दिल्लीला विजयासाठी अखेरच्या षटकात पुन्हा एकदा ६ धावांची गरज होती.

अखेरच्या षटकात लॉरा वोल्व्हार्ड स्ट्राईकवर होती. पण लॉराने पहिल्याच चेंडूवर चौकार लगावला. पण सोफी एकलस्टनने विजयासाठी दिल्लीला अखेरच्या चेंडूपर्यंत वाट पाहायला लावली. पण लॉराने अखेरच्या चेंडूवर चौकार लगावत संघाला विजय मिळवून दिला.

दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकत युपी वॉरियर्ज संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं होतं. युपीची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. किरण नवगिरे पहिल्याच षटकात मारिजन कापने बाद केलं. यानंतर कर्णधार मेग लॅनिंगने ३८ चेंडूत ९ चौकार व एका षटकारासह ५४ धावा केल्या. तर फिबी लिचफिल्ड २७ धावा करत बाद झाली. यानंतर हरलीन देओलने ३६ चेंडूत ७ चौकारांसह ४७ धावांची खेळी करत रिटायर्ड आऊट झाली. यानंतर सर्व फलंदाज झटपट बाद झाल्याने युपीचा संघ २० षटकांत ८ बाद १५४ धावा करण्यात यशस्वी ठरला.

# बॅडमिंटन स्पर्धेत नाशिक, मुंबई, नागपूर, कोल्हापूरची घोडदौड




**नाशिक :** जिल्हा बॅडमिंटन संघटनेच्या वतीने आणि महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन संघटनेच्या मार्गदर्शनाखाली नाशिक येथे आयोजित ३५ वर्षे आणि त्यावरील विविध नऊ वयोगटाच्या महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेत यजमान नाशिक, मुंबई, नागपूर, कोल्हापूर, पुणे, ठाणेच्या खेळाडूंनी उत्तम कामगिरी केली.

नाशिकचे चंदन जाधव, प्रणव सवाई-सुजय आघारकर, प्रशांत दुधेंडिया-सौरभ गाडगीळ, निश्रिता प्रभू-वर्षा थोरात यांनी उपांत्य फेरी गाठली. स्पर्धेत तिसऱ्या आणि चौथ्या दिवशी ३५ वर्षे, ४० वर्षे, ४५ वर्षे आणि ५० वर्षे या विविध गटांचे सामने खेळिवले गेले. नाशिकच्या गंगापूर रोडजवळील केन्सिंगटन क्लब येथे ही स्पर्धा सुरु आहे. पुरुषांच्या ४० वर्षे वयोगटामध्ये नाशिकचे दुसरे मानांकन असलेले चंदन जाधव याने नागपूरच्या बाळकृष्ण भावे याचा २१-१६ आणि २१- १३ अशा सरळ दोन सेटमध्ये पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. ३५ वर्षे गटाच्या दुहेरी प्रकारात नाशिकच्या प्रणव सवाई-सुजय आघारकर आणि मुंबईच्या सागर पाटील-सोमनाथ सोनावणे यांच्यातील उपउपांत्य लढत फारच चुरशीची झाली.

नाशिकच्या जोडीने एकमेकांमध्ये चांगला समन्वय राखत पहिल्या सेटमध्ये आघाडी घेत हा सेट २१-१३ असा जिंकून १-० अशी आघाडी घेतली. दुसऱ्या सेटमध्ये मात्र मुंबईच्या जोडीने संयमाने खेळ करत सेट २१-१६ असा जिंकून १-१ अशी बरोबरी साधली. तिसऱ्या निर्णायक सेटमध्ये १०-१० अशी बरोबरी होती, त्यानंतर मात्र नाशिकच्या प्रणव -सुजय जोडीने उत्कृष्ट खेळ करीत सेट २१-१७ असा जिंकून सामनाही जिंकत उपांत्य फेरीत आपले स्थान पक्के केले. पुरुषांच्या ४० वर्षे गटात दुहेरी प्रकारात नाशिकच्या प्रशांत दुधेंडिया-सौरभ गाडगीळ आणि मुंबई उपनगरच्या मितेश अरोरा-विकास शेट्टी जोडीचा सामना २-२ अशा बरोबरीत असतांना मुंबईचा खेळाडू जखमी झाल्यामुळे या सामन्यात नाशिकच्या जोडीला उपांत्य फेरीसाठी चाल मिळाली. पुरुषांच्या ३५ वर्षे गटात एकेरीमध्ये निनाद कामत (कोल्हापूर), ओंकार पालकर (सातारा), सोमनाथ सोनावणे आणि जसविंदर सिंग (दोघेही मुंबई शहर) यांनी उपांत्य फेरी गाठली.

# ‘मोठी लढाई लढू, मातीसाठी रं गड्या’

## प्रसिद्ध मराठी अभिनेत्रीची राज ठाकरेंसाठी पोस्ट

**मुंबई :** महापालिकेसह २९ महापालिकांसाठीचं मतदान सुरु झालं आहे. महापालिकेच्या रणधुमाळीत आपल्या आवडत्या पक्षाला, नेत्याला पाठिंबा देण्यासाठी अनेक कलाकार प्रचारात उभारलेले दिसले. पक्षाची माळ गळ्यात घातलेल्या कलाकारांचे अनेक व्हिडीओही व्हायरल होत आहेत. दरम्यान प्रसिद्ध मराठी अभिनेत्रीने मनसे अध्यक्ष राज ठाकरेंसाठी खास पोस्ट लिहून ते स्टेटस ठेवलं आहे ज्याची चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे.

अभिनेत्री तेजस्विनी पंडित. तिने भ्रष्ट हातांत पालिका देऊ नका अशी एक पोस्ट शेअर केली होती. त्यामुळे ती चर्चेत होती. तेजस्विनी पंडित सोशल मीडियावर बऱ्यापैकी चर्चेत असते. सामाजिक, राजकीय घडामोडींवर ती कायम तिचं स्पष्ट मत व्यक्त करताना दिसते. महापालिका निवडणुकीला उगी काही तास शिल्लक असताना अभिनेत्री तेजस्विनी पंडितने राज ठाकरे यांचा फोटो शेअर करत त्यांना पाठिंबा दर्शवलाय. या पोस्टचे सध्या एकच चर्चा आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तब्बल २० वर्षांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे एकत्र आले आहेत. मुंबई महापालिकेसाठी उद्धवसेना-मनसे- राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार अशी मुख्य लढत होत आहे. राज्यातील सर्व महापालिकांसाठी आज १५ जानेवारी २०२६ मतदान पार पडणार आहे. मुंबई महापालिकेवर कोणाची सत्ता येणार याकडे सर्वांची नजर असताना अभिनेत्री तेजस्विनी पंडितने मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना पाठिंबा देणारी पोस्ट केली आहे. ‘ मोठी लढाई लढू. मातीसाठी रं गड्या .. मनगटाचा जोर लावून .. तू आभाळ आभाळ, वादळ तुझं तू राजा आसमानीच बळ दावजीः’ या गाण्याच्या ओळी कॅप्शन मध्ये लिहीत तेजस्विनीने राज ठाकरे यांचा एक फोटो शेअर केला आहे.

तेजस्विनी पंडितने एक पोस्ट याआधीही केली होती. भ्रष्ट हातांत महापालिका देऊ नका अशी एक पोस्ट शेअर केली होती. तिने लिहिले,ङ्क आपल्या रोजच्या जीवनात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणारी




नगरसेवक असतात.म्हणूनच भ्रष्ट माणसांच्या हातात पालिका देऊ नका.सतर्क रहा.योग्य,सुज्ञ आणि सुशिक्षित उमेदवारांना निवडून द्या.ङ्ख असं तिने लिहिलंय.यासोबत तिने एक व्हिडिओ आपला ळपींरसीरा वर रि-शेअर केलाय. २९ महानगरपालिकांतील एकूण २,८६९ जागांसाठी १५,९३१ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. जवळपास नऊ वर्षांच्या खंडानंतर होत असलेल्या या महानगरपालिका निवडणुका सर्वच प्रमुख राजकीय पक्षांसाठी प्रतिष्ठेचा विषय ठरल्या आहेत.

# अल्लू अर्जुनचा बोलबाला ; ’पुष्पा २’ची परदेश वारी, प्रेक्षकांची मनं जिंकणार का ?

## ’पुष्पा २’ परदेशात प्रदर्शित होणार ; अल्लू अर्जुन टोकियोला पोहचला

**मुंबई :** साऊथ अभिनेता अल्लू अर्जुन कायम कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असतो. अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २' ने जगभरात खळबळ उडवून दिली. 'पुष्पा २' चित्रपट डिसेंबर २०२४ मध्ये रिलीज झाला. मीडिया रिपोर्टनुसार, चित्रपटाने १७८० कोटी रुपयांची कमाई केली. आता मात्र पुष्पाच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे.



साऊथचा पुष्पा आता जपानमध्ये दिसणार आहे. अल्लू अर्जुनचा 'पुष्पा २' चित्रपट जपानमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाची रिलीज डेट समोर आली आहे. मीडिया रिपोर्टनुसार,'पुष्पा २' जपानमध्ये १६ जानेवारीला रिलीज होणार आहे.

'पुष्पा २' जगभरात दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक कमाई करणारा भारतीय चित्रपट बनला आहे. निर्मात्यांनी सांगितले की, जपानी लोकांनी चित्रपट जपानमध्ये प्रदर्शित करावा अशी विनंती केली होती. त्यानंतर हा चित्रपट 'पुष्पा: कुनरीन' या शीर्षकाने प्रदर्शित होत आहे. पूर्वी हा चित्रपट फक्त पाच भाषांमध्ये प्रदर्शित झाला होता. 'पुष्पा २' हा एक ॲक्शन चित्रपट आहे. २०२१मध्ये रिलीज झालेला 'पुष्पा द राइज' या चित्रपटाचा सीक्वल आहे. चित्रपटात अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदान्ना झळकले आहेत. 'पुष्पा २' चित्रपट सुकुमार दिग्दर्शित आहे. या चित्रपटातील अल्लू अर्जुनआणि रश्मिका मंदानाची केमिस्ट्री चाहत्यांना खूप आवडली आहे.अल्लू अर्जुनच्या आगमी चित्रपटांची चाहते उत्सुकतेने वाट पाहत आहेत. अल्लू अर्जुन लवकरच लोकेश कनगराज दिग्दर्शित 'AA23' मध्ये झळकणार आहे. तसेच अल्लू अर्जुन ॲटलीचा आगामी प्रोजेक्ट 'AA22XA6' मध्ये दिसणार आहे. या चित्रपटात त्याच्यासोबत दीपिका पदुकोण झळकणार असल्याचे बोले जात आहे.

# अभिनेत्री प्राजक्ता माळीनं केलं मतदारांना कळकळीचे आवाहन

**मुंबई :** मुंबई, ठाणे, पुण्यासह राज्यात आज २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. सकाळी साडेसातपासून मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली होणार आहे. त्याआधी मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केलेय. कोणतेही कारण देऊन मतदान करणे टाळू नका, असे प्राजक्ता माळी हिने म्हटलेय.



विविध पक्षांसह अपक्ष उमेदवार रिंगणात उतरले असून, एकूण १५,९३१ उमेदवारांचे राजकीय भवितव्य आज मतपेटीत बंद होणार आहे. शहरांच्या विकासाची दिशा ठरवणाऱ्या या निवडणुकांकडे राज्याचे लक्ष लागले आहे. मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे, असे आवाहन निवडणूक आयोगाकडून करण्यात आले आहे... दरम्यान १६ जानेवारीला लागणाऱ्या निकालाबद्दल मोठी उत्सुकता निर्माण झालीय.

# कॅप्टन्सी कार्यात मोठा वाद! ‘हे’ स्पर्धक हाणामारीवर आले, पहिल्याच आठवड्यात नियमाचं उल्लंघन?

**मुंबई :** बिग बॉस मराठी ६ च्या पहिल्या आठवड्याचा नॉमिनेशन टास्क बुधवारी झाला. त्यानंतर आता गुरुवारच्या एपिसोडमध्ये कॅप्टन्सी टास्क होणार आहे. बिग बॉस मराठी सीझन ६ चा पहिला कॅप्टन कोण होणार? यासाठी इझ फार्म नावाचा टास्क खेळवण्यात येणार आहे. ‘कार्य कॅप्टन्सीचे, झुंज समर्थकांची’ असं या टास्कचं नाव आहे.

नॉमिनेशन टास्कमध्ये बिग बॉसने एक ट्विस्ट आणला होता. त्या ट्विस्टनंतर पॉवर की असूनही शॉर्टकट दरवाजाने घरात आलेले तीन सदस्य नॉमिनेट झाले, तर तन्वी, सोनाली आणि प्राजक्ता या तिघी जणी कॅप्टन्सीच्या दावेदार ठरल्या. या तिघींपैकी कॅप्टन कोण होणार, यासाठी इझ फार्म नावाचा टास्क होणार आहे. त्या तिघींसाठी हा टास्क घरातील इतर सदस्य खेळतील, असं थीमवरून दिसून येतंय.

कॅप्टन्सी टास्कचा पहिला प्रोमो कलर्स मराठीने शेअर केला आहे. या टास्कमध्ये विशाल कोटियन व ओमकार राऊत यांच्यात जोरदार वाद होणार आहे. जे सदस्य ज्या कॅप्टन पदाच्या दावेदाराचे समर्थक आहे, तिच्यासाठी फार्ममधील वस्तू गोळा करतील, असं दिसतंय. याचदरम्यान विशाल ओमकारच्या हातातील वस्तू घेण्यासाठी त्याला अडवतो. नंतर तो ओमकारला अशा पद्धतीने पकडतो की तो ओरडून पकडलेला गळा सोड असं बोलतो. ओमकार विशालला ‘गळा सोड ना यार, गळा सोड, माझा गळा का दाबतोय,’ असं जोरात म्हणतो. तो कसाबसा स्वतःची सुटका करून घेतो. त्यानंतर दोघांमध्ये जोरदार वाद होतो. नंतर भडकलेला ओमकार विशालशी भांडतो, तेव्हा आयुष संजीव व दिव्या शिंदे मधे उभे राहून दोघांनी शारीरिक हिंसाचार करू नये यासाठी प्रयत्न करतात. ‘तू आधीच गळा दाबलेला होता,’ असं ओमकार म्हणतो. यावर विशाल ‘तू मारणार का?’ असं विचारतो. यानंतर भडकलेला ओमकार विशालला नडतो, असं प्रोमोमध्ये पाहायला मिळतंय. बिग बॉस मराठीच्या या नव्या प्रोमोवर चाहत्यांनी कमेंट्स केल्या आहेत. मराठी बिग बॉस आहे तर भाषा पण मराठीच वापरा ना!!! अरे हे मराठी बिगबॉस आहे रे! आले बॉडी बिल्डर ताकद दाखवायला, आले प्रोटीन बार्स, डोकं फोडा आणि कॅप्टन व्हा, आधीच्या सीझन मध्ये १५ दिवसांनी भांडण सुरू करायचे पण हे पहिल्या दिवसापासून सुरू झालेत, अशा कमेंट्स नेटकऱ्यांनी या प्रोमोवर केल्या आहेत.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# श्री गुरू तेग बहादूर यांचे ३५० वे शहिदी समागम वर्ष

**जनसंचलन/ बुलढाणा**

हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त देशभर विविध प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रमाचे आयोजन नांदेड येथे करण्यात आले आहे. श्री गुरू तेग बहादूर हे शीख समाजाचे नववे गुरू आहेत. मानवाधिकारांच्या सुरक्षेसाठी कार्य करताना ते शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, मानवता, करूणा आणि धैर्य या मूल्यांचा संदेश दिला. त्यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षा निमित्त महाराष्ट्र शासन आणि हिंदी दी चादर श्री गुरू तेग बहादूर ३५० व्या शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या संयुक्त विद्यमाने नागपूर व नवी मुंबई येथे भव्य कार्यक्रमांचे आयोजन झाले. आता २४ व २५ जानेवारीला नांदेड येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाचा मुंबई येथील कार्यशाळेने शुभारंभ करण्यात आला होता. श्री गुरू तेग बहादूर यांच्या कार्याचा आणि हौतात्म्याचा इतिहास सर्वदूर विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून पोहोचविण्यात येणार आहे. तहसील, शहर जिल्हा व क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात आणि घराघरात श्री गुरू तेग बहादूर यांच्या हौतात्म्याचा इतिहास पोहोचविला जाणार आहे. या गौरवशाली इतिहासाच्या स्मृती सोहळ्यानिमित्त शीख, सिकलीगर, बंजारा,लबाना, मोहयाल, सिंधी समाजाचे गुरुबंधुत्व नाते अधिक दृढ होणार आहे. समन्वय समितीच्या माध्यमातून प्रचार व प्रसाराचे कार्य यशस्वीपणे पार पाडणार आहे. श्री गुरू तेग बहादूर यांची शहादत व योगदान हे धर्म आणि मानवतेच्या रक्षणाचे तेजस्वी प्रतीक आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या शौर्याचा आणि श्रद्धेचा गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमामुळे या सहा समाजाच्या गौरवशाली, पराक्रमी आणि धर्मनिष्ठ इतिहासाला नवे बळ मिळणार असून गुरुबंधुत्वाचा हा पवित्र वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# सैलानी बाबा यात्रेच्या तयारीला वेग जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला पूर्वतयारीचा आढावा

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा तालुक्यातील मौजे पिंपळगाव सराई येथील सैलानी बाबा दर्गा परिसरात साजऱ्या होणाऱ्या सैलानी बाबा यात्रा महोत्सवाच्या तयारीला गती आली आहे. या यात्रेच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समितीची आढावा बैठक त्यांच्या कार्यालयात मंगळवारी घेण्यात आली. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सैलानी बाबा यात्रा महोत्सव २५ फेब्रुवारी ते १२ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. यात्रेदरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २ मार्च २०२६ रोजी नारळाची होळी पेटविण्यात येणार असून, त्यानंतर यात्रेला खऱ्या अर्थाने सुरुवात होईल. ८ मार्च २०२६ (पंचमी) रोजी संदल मिरवणूक काढण्यात येणार आहे. ही मिरवणूक ग्रामपंचायत पिंपळगाव सराई येथून मुजावर परिवाराच्या संदल घरातून रात्री ८ वाजता निघून गावातील प्रमुख मार्गावरून परिक्रमा करत जंगलगाठ रस्त्याने सुमारे ४ किमी अंतर पार करून रात्री १२ वाजता सैलानी बाबा दर्गा येथे पोहोचेल. १२ मार्च २०२६ रोजी फातेखानी कार्यक्रमानंतर सैलानी बाबा ट्रस्टकडून प्रसाद




वाटप करून यात्रेची सांगता होईल. सैलानी बाबा दर्गा हे सर्व जाती-धर्मीय भाविकांचे श्रद्धास्थान असल्याने यात्रेत बुलढाणा जिल्ह्यासह मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र तसेच महाराष्ट्राबाहेरील आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात आदी राज्यांतून मोठ्या संख्येने भाविक सहभागी होतात. यंदा अंदाजे ५ ते ७ लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. यात्रा व्यवस्थापनासाठी महसूल विभाग, पोलीस यंत्रणा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, आरोग्य विभाग, परिवहन विभाग, विद्युत वितरण कंपनी, सैलानी बाबा दर्गा ट्रस्ट, मुजावर, ग्रामपंचायत पिंपळगाव सराई व घाटनांद्रा, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर परिषद बुलढाणा/चिखली, पशुसंवर्धन विभाग, अन्न व औषध प्रशासन आदी विभागांच्या तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर आढावा घेतला. जल्हाधिकारी डॉ. किरण पाटील म्हणाले की, सैलानी बाबा यात्रा परिसराची अधिकाऱ्यांनी पाहणी करून रस्ते दुरुस्ती, कडेकोट पोलीस बंदोबस्त व सीसीटीव्ही यंत्रणा, अखंड वीजपुरवठा, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, दर्गा व शौचालयांसाठी पाणी-साफसफाई व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, वाहतूक नियोजन व बॅरिकेटिंगसह पार्किंग, भाविकांसाठी एसटीच्या अतिरिक्त बस सेवा, हाराशीद्वारे दुकानदारांना जागा, अन्न पदार्थ तपासणी, नारळ होळी व बळी प्रथेसाठी स्वतंत्र जागा, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी जनजागृती फलक, आरोग्य शिबिरे (डॉक्टर, रुग्णवाहिका व औषधसाठा), अग्निशमन वाहने, मदत कक्ष व उद्घोषणा यंत्रणा तत्काळ कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले. यात्रा शांततामय, सुरक्षित व सुव्यवस्थित पार पडावी, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

# अनोळखी मृतदेह आढळला: ओळखणाऱ्यांनी संपर्क करण्याचे आवाहन


**जनसंचलन/बुलढाणा**

पोलीस स्टेशन बुलढाणा ग्रामीण येथून अनोळखी महिलेला दिव्या फाँडेशन बुलढाणा यांच्या कडुन अपघात विभाग जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथे उपचारासाठी दि. १२ जानेवारी २०२६ रोजी भरती करण्यात आले. उपचारा दरम्यान तिचा मृत्यू झाला. या मृत महिलेला ओळखणाऱ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. प्राप्त माहितीनुसार, अनोळखी महिलेचे वय ६५ ते ६८ वर्ष, उंची १६० सेमी, बांधा सळपातळ, सावळा रंग, डोक्याची केस पांढरे, अंगात लाल व पांढऱ्या रंगाचा गाऊन व कपाळावर मध्यभागी टिकली गोंदलेले दिसत आहे. या वर्णनाचा महिलेचा कोणी नातेवाईक किंवा मित्रमंडळी ओळखत असल्यास पोलीस स्टेशन, बुलढाणा(ग्रामीण) येथे किंवा तपास अधिकारी ९८२३७१७१८० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अरुणोदय विशेष सिकलसेल तपासणी व जनजागृती मोहीम; १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील सर्व आदिवासी प्रकल्प क्षेत्रांमध्ये तसेच जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये अरुणोदय विशेष सिकलसेल तपासणी मोहीम शासनाच्या निर्देशांनुसार राबवली जाणार आहे. ही मोहिम १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविली जाणार असून या तपासणी शिबिरांचा लाभ नागरिकांनी, विशेषतः आदिवासी व उच्च जोखमीच्या समूहातील व्यक्तींनी घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे. अरुणोदय विशेष सिकलसेल तपासणी व जनजागृती मोहीम जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य विभागामार्फत उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्र स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सिकलसेल आजार हा आनुवंशिक रक्तविकार असून त्याबाबत वेळेवर तपासणी, अचूक निदान व योग्य उपचार आवश्यक आहेत. नागरिकांमध्ये या आजाराविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने बुलढाणा जिल्ह्यातील सर्व आदिवासी प्रकल्प क्षेत्रे तसेच तालुक्यांमध्ये ही मोहीम राबविण्यात येणार आहे. मोहीमेदरम्यान सिकलसेल रक्त तपासणी शिबिरे, कौटुंबिक समुपदेशन, जनजागृती व्याख्याने, शाळा व महाविद्यालयांमध्ये आरोग्य शिक्षण कार्यक्रम, तसेच फिल्ड स्तरावर घरभेटी, तपासणी व फॉलोअप करण्यात येणार आहेत. याशिवाय सिकलसेल रुग्णांच्या उपचार व औषध उपलब्धतेबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे दिली.



# हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेडमधील भव्य कार्यक्रम यशस्वी

जनसंचलन/बुलढाणा

हिंद दी चादरफ श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे होणाऱ्या भव्य कार्यक्रमाचे सर्वांगीण व काटेकोर नियोजन करण्यात यावे. देशासह आंतरराष्ट्रीय स्तरावरून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असून, त्यांच्या सुरक्षा, वाहतूक, वैद्यकीय सेवा व मूलभूत सोयी-सुविधांबाबत सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांनी दिल्या. नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या या भव्य कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी आज मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस अल्पसंख्याक विकास विभागाचे सचिव रूचेश जयवंशी, राज्य समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. तर दूरदृश्य प्रणालीद्वारे छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे कार्यकारी अधिकारी व शासकीय समन्वयक डॉ. जगदीश सकवान, गुरुद्वारा बोर्डाकडून अधीक्षक हरजितसिंघ कडेवाले, राज्य समितीचे डॉ. जगदीश सकवान, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर, धाराशिव, जळगाव, धुळे, नंदूरबार जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिका आयुक्त, शिक्षण, परिवहन, अल्पसंख्याक विभागाचे वरिष्ठ अधिकारी व जिल्हा माहिती अधिकारी उपस्थित होते. श्रीकर परदेशी म्हणाले की, या शहीदी समागम वर्षानिमित्त राज्य, देश तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरून श्री गुरु तेग बहादुर यांना मानणारे लाखो भाविक नांदेडमध्ये येणार आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, भगत नामदेव व उदासीन समाज-संप्रदाय असे नऊ एकत्र येणार आहेत. श्री गुरु तेग बहादुर यांच्या त्याग, बलिदान व मानवतेसाठी दिलेल्या शहीदीचा इतिहास देश-विदेशात पोहोचवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी २६ विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. सुमारे १० लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन चोख सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता, वाहतूक नियोजन, निवास व्यवस्था, स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा आदी मूलभूत सुविधा पुरविण्याच्या सूचना देण्यात आल्या. युवकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच भाविकांच्या सोयीसाठी ://. या संकेतस्थळावर रस्ते, रेल्वे, बस, वाहतूक व्यवस्था तसेच कार्यक्रमासंदर्भातील सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय समितीच्या समन्वयाने सर्व यंत्रणांनी आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहनही त्यांनी केले. सचिव रुचेश जयवंशी म्हणाले की, मराठवाडा विभागातील सर्व जिल्हे, महानगरपालिका, शाळा-महाविद्यालये, पोलीस यंत्रणा व परिवहन विभागाने समन्वयाने काम करत भाविकांना सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात तसेच सुरक्षेच्या दृष्टीने काटेकोर कार्यवाही करावी. रामेश्वर नाईक म्हणाले की, श्री गुरु तेग बहादुर यांनी राष्ट्र व संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान सर्वसामान्य जनतेपर्यंत, विशेषतः गावपातळीवर विविध उपक्रमांच्या माध्यमातून पोहोचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वोत्तम संस्था आणि विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाच्या माध्यमातून मुख्यमंत्री यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी राहूल कर्डिले म्हणाले की, मुख्य कार्यक्रम असर्जन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर होणार असून मैदानाचे सपाटीकरण व स्वच्छतेच्या कामासह मुख्य पेंडाल उभारणीसाठी आवश्यक सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. विद्युत व पाणीपुरवठ्याची व्यवस्था लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. भाविकांसाठी जिल्हानिहाय पार्किंगची ठिकाणे निश्चित करण्यात आली असून निवासासाठी शहरातील शाळा, महाविद्यालये व मोकळ्या जागा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वाहतूक व्यवस्थेचे सुसूत्र नियोजन करण्यात आले असून आवश्यक वाहनांची व्यवस्था देखील करण्यात येत आहे. नांदेड हे रेल्वेमार्गावर असल्याने रेल्वे विभागाच्या सहकार्याने अधिकाधिक भाविकांना रेल्वे सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. लंगर, निवास व वाहतूक व्यवस्थेचा दैनंदिन आढावा घेतला जात असून आरोग्य सेवांसाठी ७२ रुग्णालयांमार्फत वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येणार आहेत. कार्यक्रमस्थळी विविध आरोग्य स्टॉल उभारण्यात येणार आहोत. स्वच्छतेसाठी सध्या १०० शौचालयांची व्यवस्था उपलब्ध आहे. यासाठी इतर जिल्ह्यांचेही सहकार्य घेतले जाणार आहे. कार्यक्रमाच्या प्रचार-प्रसिद्धीसाठी विविध शाळांमध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून १५ जानेवारीपासून प्रभातफेऱ्या काढण्यात येणार आहेत. तसेच होर्डिंग्सद्वारे मोठ्या प्रमाणावर प्रचार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सुरक्षा व्यवस्था, पार्किंग व सुरक्षा पासेस याबाबतच्या नियोजनाची सविस्तर माहिती दिली.

# संत जयराम महाराज संस्थानच्या वतीने केंद्रीय राज्यमंत्री, मृद व जलसंधारण मंत्र्यांचा सत्कार




जनसंचलन/बुलढाणा

मेहकर तालुक्यातील श्री संत जयराम महाराज संस्थान राजगड द्वारा आयोजित भव्य यात्रा महोत्सवाला आज केंद्रीय आयुष्य आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि राज्याचे मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी संस्थानच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या यात्रा महोत्सवाच्या दरम्यान केंद्रीय राज्यमंत्री आणि मृद व जलसंधारण मंत्री यांनी संत जयराम महाराज यांचे दर्शन घेतले. यावेळी यात्रा महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित महाप्रसाद कार्यक्रमाला उपस्थित राहून भाविकांना शुभेच्छा दिल्या. तसेच टेंबुरखेडा येथील यात्रा महोत्सवालाही भेट देवून त्यांनी सत्कार स्वीकारला. यावेळी यावेळी उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी तहसीलदार, जलसंधारण अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

# जुन्या वादातून तरुणावर काठ्यांनी हल्ला....

जनसंचलन/ शेगाव



जुन्या वादातून तिघांनी एका तरुणावर काठ्यांनी हल्ला केल्याची घटना १२ जानेवारी रोजी रात्री घडली. या प्रकरणी १४ जानेवारी रोजी शेगाव शहर पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणेश नामदेव बुडुकले (वय ३९, रा. मोदी नगर, शेगाव) असे जखमीचे नाव आहे. फिर्यादीनुसार, १२ जानेवारी रोजी रात्री १०:३० वाजताच्या सुमारास गणेश बुद्धकले हे छत्रपती शिवाजी महाराज चौकातून संत गजानन महाराज मंदिराकडे जात असताना वनमाळी शामजी दुकानासमोर थांबले होते. त्यावेळी आरोपी किशोर पारधी, आकाश क्षीरसागर, गोपाळ कंकाळे (सर्व रा. मोदी नगर, शेगाव) हे तिघे पाठीमागून आले. जुन्या वादाच्या कारणावरून त्यांनी शिवीगाळ करून काठ्यांनी मारहाण केली. या हल्ल्यात बुद्धकले जखमी झाले. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८